|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
उमवि नगर, जळगाव ४२५००१ फोन 0257-2257276, 2257277 फोन 0257-2258403, 406,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/१३/ ६६ /२०२६ दिनांक:- ०१/०६/२०२६

**प्रती,**
**विद्यापीठाशी संलग्नित अनूदानित असलेल्या**
**सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य**

विषय:- समांतर आरक्षण प्रमाणीत करणेबाबत.
संदर्भ:-मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे दि. १८मे,२०२६ चे पत्र

महोदय/महोदया,

समांतर आरक्षणा संदर्भात शासनाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित केले आहेत हे आपणास विदीतच आहे. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.१८, मे, २०२६ च्या पत्रात समांतर आरक्षण धोरण विद्यापीठाशी संलग्नीत उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनूदानित महाविद्यालयांना लागू असणे बाबत व समांतर आरक्षण निश्चित करून देणे संदर्भात सदर पत्रात नमूद केले आहे. सदर पत्राची प्रत विद्यापीठाच्या nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदर पत्रानुसार कार्यवाही करावी. ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,
1.6.26
सहा.कुलसचिव(अ.का.)
(मागासवर्ग कक्ष)

सोबत:- वरील प्रमाणे

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६
Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९ ✉ : director.dhepune@nic.in

---

क्र. उशिसं/मवि-१/पदभरती/बिंदुनामावली/ई २६९३४५८ दिनांक : १८ मे २०२६

प्रति,
कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषय :- बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करताना सामाजिक आरक्षणा सोबत समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत.**

संदर्भ :-१. शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-०९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ०५ नोव्हेंबर २००९
२. शासन अधिसूचना क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ९४/१९/विशि-१, दिनांक ०७ एप्रिल २०२२
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ९४/१९/विशि-१, दिनांक ११ एप्रिल २०२२
४. शासन पत्र क्रमांक: संकीर्ण-२२०५/प्र.क्र.९८/विशि-१, दिनांक २४ जून २०२२
५. शासन परिपत्रक क्रमांक : राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ , दिनांक २५ जानेवारी, २०२४
६. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण, क्र. HTED-E-No.९६७३५०/२०२५- MHT-(HE-५), दि.११ फेब्रुवारी, २०२६.
७. शासन पत्र क्र: HTED-E-No.९६७३५०/२०२५-MHT-(HE-५) दिनांक २३ मार्च, २०२६

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ११.०२.२०२६ नूसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठाशी संलग्नीत उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील दिनांक ०१.१०.२०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार परिगणीत केलेल्या कार्यभारानुसार सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी ५०१२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आली होती.

२. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून कार्यकक्षेतील महाविद्यालयांना पदभरतीस अनुज्ञेय पदाबाबत माहिती कळविलेली आहे.

३. शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-०९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ सोबतचे प्रपत्र अ मधील अ.क्र. १ नुसार विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील महाविद्यालये (वर्ग ४ ते वर्ग १ संवर्ग) यांची बिंदुनामावली संबंधित संस्था / नियुक्ती प्राधिकारी हे ठेवतात तसेच सदरहू बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी विद्यापीठ मागासवर्ग कक्ष यांचेमार्फत करण्यात येते.

४. राज्यात सरळसेवा भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरण लागू आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण असून त्याला उभे आरक्षण (Vartical Reservation) म्हटले जाते. त्याचप्रमाणे काही विशेष घटकांना सुध्दा आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्याला समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) असे म्हटले जाते.

५. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक : राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ ,दिनांक २५ जानेवारी, २०२४ अन्वये राज्यात सरळसेवा भरतीसाठी असलेले **समांतर आरक्षणाची** टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | समांतर आरक्षण प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | महिला | ३०.००% |
| २ | माजी सैनिक (फक्त क व ड च्या पदांवर) | १५.००% |
| ३ | दिव्यांग | ४.००% |
| ४ | खेळाडू | ५.००% |
| ५ | प्रकल्पग्रस्त (फक्त क व ड च्या पदांवर) | ५.००% |
| ६ | भूकंपग्रस्त (फक्त क व ड च्या पदांवर) | २.००% |
| ७ | पदवीधर अंशकालीन (फक्त क व ड च्या पदांवर) | १०.००% |
| ८ | अनाथ | १.००% |

६. वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार सहाय्यक प्राध्यापक पदभरतीसाठी महिला, दिव्यांग, खेळाडू व अनाथ हे समांतर आरक्षण लागू आहे.

७. समांतर आरक्षणासंदर्भात संबंधित विभागाच्या स्तरावर खातरजमा करावी, अश्या सूचना सामान्य प्रशासन विभागाकडून देण्यात आल्या आहेत. समांतर आरक्षणसंदर्भातील अनुसरावयाची कार्यपध्दती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना या शासकीय अनुदानप्राप्त संस्था/ विद्यापीठे यांना लागू आहेत.

८. दिव्यांग व अनाथ आरक्षण वगळता अन्य समांतर आरक्षण घटकांसाठी कप्पीकृत समांतर आरक्षण धोरण असून, रिक्त पदांच्या प्रमाणात समांतर आरक्षणाच्या घटक निहाय टक्केवारीनुसार त्या त्या सामाजिक प्रवर्गात पदे राखून ठेवण्यात यावी.

तसेच दिव्यांग व अनाथ आरक्षणासाठी एकूण समांतर आरक्षण धोरणानुसार भरावयाच्या एकूण रिक्त पदांवर अनुक्रमे ४ टक्के व १ टक्का या प्रमाणात पदे राखून ठेवावीत. ती स्वतंत्र दर्शविण्यात यावीत.

९. समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा, अ.ज, वि.ज (अ), भ.ज(ब), भ.ज (क), भ.ज.(ड), वि.मा.प्र, इ.मा.व, ईडब्ल्यूएस आणि खुला/अराखीव प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करणे आवश्यक असून, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर कार्यध्दतीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

१०. सबब शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-०९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील वरिष्ठ महाविद्यालये असलेल्या संस्थेच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करतेवेळी पदभरतीसाठी भरावयाच्या रिक्त पदावर विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाने आरक्षण बिंदूनामावलीमध्ये सामाजिक आरक्षणासोबत समांतर आरक्षण (उदा. महिला, दिव्यांग, अनाथ इ.) प्रमाणित करुन देणे बंधनकारक राहील.

तसेच, विद्यापीठाने जाहिरातीचा मसुदा अंतिम करताना समांतर आरक्षणाची पदसंख्या जाहिरातीमध्ये अचूक दर्शविण्यात आलेली असल्याची दक्षता घ्यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 18-05-2026 16:56:57

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रत : मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.
प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे स्वीयसहाय्यक यांना माहितीस्तव.
प्रत : मा. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे यांना माहितीस्तव.
प्रत : सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत : उपकुलसचिव व सहाय्यक कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.